# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन


**ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,**

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ **कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५** ई-मेल : amfupune@gmail.com


**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०६/०४/२०२१**

## जिल्हा : पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३६.२ ते ३९.५ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १४.४ ते २०.५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ५५ ते ८१ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ११ ते १८ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.५ ते ५.८ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३९ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १८ ते १९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ३१ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ११ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०९ ते १६ कि.मी. दरम्यान राहील. आकाश अंशतः ढगाळ ते ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा नैऋतेकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (३१/०३/२०२१ ते ०६/०४/२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०६/०४/२०२१ ते १०/०४/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **31** | **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | दिनांक | **7** | **8** | **9** | **10** | **11** |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 36.2 | 38.2 | 36.8 | 37.2 | 37.8 | 38.2 | 39.5 | कमाल तापमान (अं.से.) | 39 | 39 | 39 | 39 | 39 |
| 14.4 | 16.7 | 17.6 | 18.8 | 20.5 | 19.9 | 18.9 | किमान तापमान (अं.से.) | 19 | 19 | 18 | 18 | 19 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 1 | 1 | 4 | 2 | 2 |
| 68 | 56 | 55 | 61 | 75 | 81 | 67 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 29 | 26 | 42 | 32 | 26 |
| 11 | 11 | 12 | 18 | 15 | 16 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 10 | 10 | 15 | 11 | 10 |
| 4.5 | 3.9 | 4.4 | 3.7 | 5.8 | 3.1 | 2.5 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 12 | 10 | 9 | 10 | 16 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 298 | 249 | 274 | 290 | 164 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०६ ते १० एप्रिल, २०२१ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पक्व झालेली पिकांची काढणी करुन घ्यावी. काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>• काढणी व मळणी झालेल्या धान्यास ६ ते ७ दिवस चांगले उन्हात वाळवून कोठीत साठवावे. धान्यात कडूनिंबाचा पाला ५ टक्के मिसळावा. साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये.<br>• कोरडे हवामान लक्षात घेता उभी पिके, भाजीपाला व फळबागांना स्थानिक परिस्थिती, जमिनीची खोली, जमिनीचा प्रकार व गरजेनुसार पाणी द्यावे.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल अॅपचा वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | • तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| भुईमूग | आर्यांग सुटण्याची अवस्था | उन्हाळी भुईमूगाच्या आ-या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करु नये. आ-या जमिनीत जाण्याच्या वेळी ते शेंगा पोसण्याची कालावधीत पिकास पाण्याचा ताण पडणार नाही याची दक्षता घ्यावी. भुईमुगास शक्य असल्यास स्प्रिंकलर पद्धतिने पाणी द्यावे. कोरडे हवामान लक्षात घेता उन्हाळी भुईमुगास जमिनीच्या मगदूरा प्रमाणे स्थानिक परिस्थिती, जमिनीची खोली, जमिनीचा प्रकार व गरजेनुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी पिकावर क्लोरोपायरीफॉस २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | सुरु उसाची लागण झालेल्या क्षेत्रात पिक ४ महिन्याचे होई पर्यंत खुरपणी व कोळपणी करून तण विरहीत ठेवावे. उन्हाळा चालू झाल्याने उसाला योग्य वेळेच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. ऊस पिकासाठी ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. पाचट आच्छादनाचा वापर करून सरी आड सरीतून पाणी द्यावे. उसात खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास एकरी दोन फुले ट्रायकोकार्डची १० दिवसाच्या अंतराने आवश्यकतेनुसार २ ते ३ प्रसारणे करावीत. |
| गहू | पक्वता ते काढणी अवस्था | पक्व पिकांची काढणी करून घ्यावी. काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. गहू पिकाची कापणी पिक पक्व होण्याच्या २-३ दिवस आधी करावी त्यामुळे गव्हाचे दाने शेतात झडण्याचा प्रकार टाळता येईल. कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ % किंवा कमी असावे. |
| मिरची | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे मिरची पिकावर चुरडा-मुरडा: हा विषाणूजन्य रोग पांढरी माशी व फुलकिडे या किडींमार्फत होऊ शकतो. यामध्ये पिकांची पाने बारीक वाकडी होऊन सुरकुत्या पडल्यासारखी निस्तेज दिसतात. त्यामुळे झाडांची वाढ खुंटते. आवश्यकतेनुसार पांढरी माशी नियंत्रणासाठी पिवळे तसेच फुलकिड्यांसाठी निळे चिकट सापळे वापरावेत. रासायनिक कीडनाशकांचा वापर करावयाचा झाल्यास फुलकिडे नियंत्रणासाठी फिप्रोनील (५ ई.सी.) १५ मिली किंवा स्पिनोसॅड (४५ ई.सी.) ४ मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| टोमॅटो | फळ धारण अवस्था | टोमॅटो वरील फळे पोखरणारी अळी - ही अळी प्रथम पाने खाते व नंतर हिरवी किंवा पिकलेली फळे पोखरून आत शिरते व गर खाते या किडीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ % ईसी २० मिली किंवा नोव्हॅलीरॉन १० % ईसी १५ मिली किंवा क्लोरॅनट्रॅनीप्रोल १८.५ % एस.सी ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून ८ ते १० दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या कराव्यात. |
| कांदा | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे कांदा पिकावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५; २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कांदा पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० % प्रवाही १५ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ % प्रवाही ६ मिली या किटकनाशकांच्या प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| आंबा | फळधारण अवस्था | नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना वाऱ्यापासून संरक्षणासाठी काठीचा आधार द्यावा. मोठ्या झाडांना फळधारणेनंतर जमिचा प्रकार, झाडाचे वय, पाण्याची उपलब्धता ई. विचारात घेवून योग्य वेळेच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. बागेत झाडांच्या आळ्यांमध्ये गवत, पालापाचोळा ई. अछ्यादनाचा वापर करावा. |
| डाळिंब | तेलकट डाग रोग नियंत्रण | तेलकट डाग रोग नियंत्रणासाठी झाडांची नैसर्गिकरीत्या पानगळ होई पर्यंत ताण द्यावा. पानगळ झालेल्या काड्याच्या शेंड्याकडील भाग वाळून जाई पर्यंत ताण द्यावा त्यामुळे काड्यांमधील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने तसेच उच्च तापमानामुळे डोळ्यांजवळ असणारे जीवाणू मारून जातील व पुढील बहारा मध्ये रोगाचे प्रमाण कमी होईल. बहार छाटणी करतेवेळी शेंड्याकडील १० ते १५ से.मी. लांबीचा भाग छाटून काढावा तसेच शिफारशीत खतांची मात्रा देवून नियमित पाणीपुरवठा करावा. |
| द्राक्ष्य | काढणी व | सध्या पूर्ण काढणी झाली असल्यास पुढील खरड छाटणी करण्याचे नियोजन असेल तर तदपुर्वी |

| | | |
|---|---|---|
| | विश्रांती अवस्था | जमिनीचे व पाण्याची अन्नद्रव्य व खताच्या नियोजनासाठी तपासणी करून घ्यावी. |
| केळी | | वाढते तापमान लक्ष्यात घेता बागेस योग्य प्रमाणात पाणीपुरवठा करावा. बागेत केळी वा फ्याच्या. मधल्यात जागेत केळी पाने, जुना गव्हाचा भुसा, उसाचे पाचट, सोयाबीन भुसा, गवत, पालापाचोळा यांचा वापर करून सेंद्रिय आच्छारदन करावे. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | उन्हाळी हंगामात जनावराना हिरवा ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून जर मुरघास तयार केला असेल तर हिरव्या चार्यातस पर्याय म्हणून मुरघास खाऊ घालावा. सोबत सुका चारा सुद्धा द्यावा. जनावरांना नेहमी स्वच्छ व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना गोठ्यात / सावली मध्ये ठेवावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : ०६.०४.२०२१

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**